**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- **dydepune@gmail.com** वेब साईट- **www.dydepune.com**

---

**अत्यंत तातडीचे** **जा.क्र.उमाशि-३/११ वी ऑनलाईन/उपोषण/पुवि/२०१६/** 9६८२८
**दिनांक -** 26 JUL 2016

**प्रति,**

प्राचार्य,
सर परशुराम महाविद्यालय, पुणे
मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
एस एम जोशी कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर,
साधना कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर
श्री म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी पुणे.
जयहिंद कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरी वाघिरे, पुणे

**विषय :- प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना जादा तासिका घेवुन अभ्यासक्रम पुर्ण करणेबाबत ..**

**संदर्भ :- इ.११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश नियंत्रण समिती सन २०१६-१७ यांनी दि.२६.०७.२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिय सन २०१६-१७ शासन निर्णय दि. २८.०३.२०१६ नुसार सुरु आहे. सदर शासन निर्णयानुसार आज अखेर चार फे-या पुर्ण होवुन विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश मिळालेला आहे. परंतु अद्याप चार फे-यात एकदाही प्रवेश न मिळालेले, दुरचे कॉलेज मिळालेले, शाखा बदल, माध्यम बदल अशा तक्रारी असणारे विद्यार्थी अद्यापही प्रवेशापासून वंचित राहीलेले आहेत.

अद्याप प्रवेशापासून वंचित राहिलेल्या व अद्याप कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवु नये म्हणुन आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात खालील तक्त्यात नमूद शाखेचे तात्पुरते जादा वर्ग दि. २७.०७.२०१६ ते दि. १३.०८.२०१६ अखेर पर्यंत घेण्यात यावेत.

| अ.क्र. | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | जादा तासिका घेण्याचा विषय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सर परशुराम महाविद्यालय, पुणे | विज्ञान |
| २ | मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे | वाणिज्य |
| ३ | एस एम जोशी कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर, | विज्ञान |
| ४ | साधना कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर | वाणिज्य |
| ५ | श्री म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी पुणे. | विज्ञान |
| ६ | जयहिंद कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरी वाघिरे, पुणे | वाणिज्य |

सदर जादा तासिका साठी आपल्या महाविद्यालयातील संबधित विषयाचे शिक्षक, वर्ग खोली, व आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदर प्रकरणी आपल्या स्तरावरुन वेळापत्रक तयार करुन या कार्यालयास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत सादर करावा. विद्यार्थी व पालक यांच्या तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

26 JUL 2016
9६८२८

26/7

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग,पुणे -१**

o/c 26/7/16

11th online letter 2016